कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत क्षेत्रात विलगीकरण कक्ष उभारण्यास येणाऱ्या खर्चास १५ व्या वित्त आयोगाच्या अबंधीत (Untied) निधी मधून मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : कोरोना-२०२१/प्र.क्र.५५/वित्त-४**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१
दिनांक : २५ मे, २०२१.

**शासन परिपत्रक :-**

कोरोनाच्या आपत्तीजनक परिस्थितीमध्ये नागरिकांच्या सुरक्षेसाठी ग्रामविकास विभागामार्फत विविध उपाय योजना राबविल्या जात आहेत. यामध्ये अर्सेनिक अल्बम-३० हे होमिओपॅथीक औषध ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करुन देणे, जिल्हा परिषदांना रुग्णवाहिका पुरविणे, तसेच जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावताना कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास, कर्मचाऱ्यांच्या वारसास दिलासा देण्यासाठी रुपये ५० लाखाचे विमा कवच लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. याच पार्श्वभूमीवर एखाद्या ग्रामपंचायतीने कोविड झालेल्या रुग्णांसाठी ग्रामपंचायत क्षेत्रात ३० किंवा त्यापेक्षा जास्त खाटांचे विलगिकरण कक्षाची मागणी केल्यास, अशा उभारण्यात येणाऱ्या विलगीकरण कक्षास १५ व्या वित्त आयोगाच्या अबंधीत(Untied) प्राप्त निधीच्या २५% च्या मर्यादेत खर्च करण्यास या परिपत्रकान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ग्रामपंचायतींमध्ये विलगीकरण कक्ष उभारण्याबाबतीत योग्य ते नियोजन करावे. त्याबाबतचा आढावा घेऊन संबंधित ग्रामपंचायतींना १५ व्या वित्त आयोगाच्या अबंधीत (Untied) निधीमधून खर्च करण्यास मान्यता द्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक **२०२१०५२७११०६३४१४२०** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e86ac5658c4f446f46a56052bf048257ffe4ea09078de9d556ae5babe8adc8b1, pseudonym=37D9D56800E3803E7F4DEAA21F9F7FAB712736F6, serialNumber=481AF6EECE7C1D432D3119135BE703BF6529E7A455A9B17708C677B565D8EE24, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2021.05.31 13:37:47 +05'30'

**( प्रविण देविचंद जैन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत-

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव
६) मा.अपर मुख्य सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहायक
७) विभागीय आयुक्त (सर्व)
८) जिल्हाधिकारी (सर्व)
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१०) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद (सर्व)
११) सरपंच (सर्व)
१२) निवड नस्ती (वित्त-४)